# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क. ४३८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२३/०७/२०१६.

**१) नौकरी लावण्याचे आमिष दाखवुन पैश्याची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २८/११/०१४ ते आज पावेतो. यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन बनावट कागदपत्र तयार करुन फिर्यादीस वनरक्षक, वनपाल, चालक, चपराशी या पदाकरीता वनविभागात योग्यतानुसार नौकरी लावुन देतो असे सांगुन फिर्यादी कडुन ५०,०००/—रु. नगदी घेवुन बनावटी ऑर्डर कॉपी देवुन नौकरी लावुन न देता फसवणुक केली. असे फिर्यादी ओंकार नामदेव पालांदुरकर वय २८ वर्ष, रा. सिल्ली यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४२०,४६८,४७१,३४ भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गोपाले पो. स्टे. कारधा हे करीत आहेत

**२) अश्लिल शब्दात बोलुन मारहान केली . :—**

दिनांक १८/०७/२०१६ रोजी १८.०० ते १८.३० वा. दर. यातील फिर्यादी व आारोपी हे एकमेकांचे नातेवाहीक असुन ते शेजारी राहतात फिर्यादीची जावु व जावुचा मुलगा यांनी तिच्या मुलीने माठ उलटा का ठेवला असे म्हणुन माठ उचलण्यास जात असतांना दोन कवेलु फुटल्याने आरोपी यांनी फिर्यादी व तिच्या मुलीला अश्लिल शब्दात बोलुन मारहान केली. असे फिर्यादी यांचे तोडीं रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४,३२३भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. तोडासे पो.स्टे. भंडारा हे करीत आहे.

**३) शेतीच्या वादातुन शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली . :—**

दिनांक २२/०७/०१६ रोजी ०८.३० वा. दरम्यान फिर्यादी अशोक मीराजी रंहागडाले वय ४५ वर्ष, रा. मोरगाव/राजेगाव व आरोपी यांचे शेताबाबतवाद असुन त्या संबधाने कोर्टात केस सुरु आहे. यातील फिर्यादीने आपल्या शेतातील पाणी देण्याकरीता आरोपीचे शेतातील धु—यावरुन पाईप लाईन टाकली असता आरोपी क्र. १ ने फिर्यादीला आमच्या शेतातुन पाईप का लावला असे म्हणुन भांडण करुन शिविगाळ करुन आरोपी क्र. २ नी धु—यातील पाईप फेकले व आरोपी क्र. २ व ३ यांनी अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली. असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २९४,५०४,५०६ भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत

४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–

दिनांक २३/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा–यांवर ०२ केसस, तिन सिटर वाहनांवरती १४ केसेस व इतर वाहनांवरती ९८ केसेस करण्यात आलेल्या आहेत

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

23/07/16

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.